बीड । रविवार
१६.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३३७
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955





# संस्थाचालकाच्या जाचाला कंटाळून शिक्षकाची आत्महत्या!

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा कृष्णा अर्बन बँकेचे अध्यक्ष विक्रम मुंडे यांच्यासह मुलाच्या जाचाला कंटाळून शिक्षकाने आत्महत्या केली आहे. कृष्णा अर्बन बँकेच्या बीड शाखेच्या परिसरात त्याने गळफास घेऊन आत्म हत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने स्वतः च्या फेसबुक पेजवर संस्थाचालकांनी कशा प्रकारे त्रास दिला हे लिहिले आहे.

केळगाव येथील आश्रम शाळेत विनाअनुदानीत पदावर शिक्षक म्हणून काम शिक्षकाने शनिवारी सकाळी बीड शहरातील कृष्णा बँकेच्या दारातच आत्म हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. केज तालुक्यातील केळगाव येथील धनंजय अभिमान नागरगोजे राहणार. देवगाव ता.केज हा कायम विनाअनुदानित

▶▶ उर्वरित पान २ वर



**मला माफ कर, ३ वर्षांच्या लेकीला चिठ्ठी लिहून शिक्षक बापाचा बँकेच्या दारात गळफास; ६ जणांची लिहिली नावे**


## धनंजय नागरगोजेंच्या फेसबुक पोस्टमध्ये काय?

‘‘श्रावणी बाळा तुझ्या बापूला शक्य झालंच तर माफकर, मी माफी मागायच्या पण लायकीचा नाही. बाळा तुझ्या बाबतीत मी खूप स्वप्न पहितली होती पण त्या स्वप्नांना स्वप्नातच ग्रहण लागले. काय करू माझ्या मनात कधी स्वार्थ आलाच नाही. कधी मी कुणाला दोन रूपयांना फसवलं नाही किंवा कुणाचं कर्ज पण घेतल नाही. श्रावणी बाळा शक्य झालंच तर कर एकदा तुझ्या बापूला माफ. कारण तुला मी एकट्याला सोडून जात आहे. तुला अजून काही कळत नाही तूझ वय आहेच किती, तीन वर्षे तुला काय कळणार ज्यांना कळायला पाहिजे त्यांना बापू कधी कळला नाही.बाळा बापूंनी कधीच कुणाचं नुकसान केलं नाही सर्वांसोबत चांगला वागला पण या नालायक राक्षस लोकांनी माझा अंधारातून खूप छळ लावला आहे. विक्रम बाबुराव मुंडे, विजय विक्रम मुंडे, अतूल विक्रम मुंडे आणि त्यांचे कार्यकरते उमेश रमेश मुंडे, गोविंद नवनाथ आव्हाड, ज्ञानेश्र्वर रजेभाऊ मुरकुटे या सर्वांनी माझा खूप छळ लावला आहे. मला हे हाल हाल करून मरणार आहेत. माझ्या मारण्याचं करणं म्हणजे मी फक्त विचारलं होत की, मी तुमच्या शाळेवर गेली १८ वर्षे झालं काम करतोय अजून मला पगार नाही आता पुढे काय करायचं त्यावर विक्रम बप्पा म्हणले तू फाशी घे म्हणजे तू मोकळा आणि मी पण दुसरा तुझ्या जागेवर कर्मचारी भरायला मोकळा हे एकूण माझ्या पाया खालची जमीनच सरकली आणि तीतून पुढे या लोकांनी मला त्रास देण्यास सुरुवात केली. श्रावणी बाळा हे सर्व राक्षस आहेत या राक्षसा मुळेच मी तुझ्या पासून दूर जात आहे. तुला एकदा पाहण्याची माझी खूप इच्छा होती पण मी एक दळभद्री बाप तुझ्या वाट्याला आलो. काय करू माझ्यापाशी कोणता पर्याय या लोकणी ठेवला नाही . बाळा डोळ्यातलं पाणी थांबत नाही. पण त्याग केल्या शिवाय पर्याय नाही.



*बीड : बीड चे सिव्हिल सर्जन डॉ.अशोक थोरात यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे.*

## बीड प्रभारी जिल्हाप्रमुखपदी उल्हास गिराम पाटील



**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने उल्हास गिराम पाटील यांची शिवसेना बीड प्रभारी जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. उल्हास गिराम पाटील यांचे गेवराई, आष्टी तर जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांचे बीड, माजलगाव आणि जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांचे केज, परळी असे कार्यक्षेत्र असेल. शिवसेना मध्यवर्ती कार्यालयातून प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकात ही माहिती देण्यात आली आहे.

## '.तर न्यायाधीश त्यांच्यासोबत होळी खेळलेच नसते'; दमानियांच्या ट्विटवर धनंजय देशमुखांची पहिली प्रतिक्रिया

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना अटक झाली आहे, सीआडीकडून या प्रकरणात आरोपपत्र देखील दाखल करण्यात आलं आहे. या प्रकरणातील दोषी पोलीस अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलं आहे.

मात्र या प्रकरणात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मोठा दावा केला आहे. त्यांनी काही फोटो



ट्विट करत सुनावणी करणाऱ्या न्यायाधीशांसोबत सक्तीच्या रजेवर पाठवलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी होळी साजरी केल्याचे म्हटले आहे.

दरम्यान आता यावर संतोष देशमुख यांचे बंधु धनंजय देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली आहे. माझ्या भावाच्या पाठीवर पडलेले रक्ताचे काळे निळे डाग या लोकांनी पाहीले असते तर, या प्रकरणातील सक्तीच्या रजेवर असलेले पोलीस अधिकारी न्यायाधिशांबरोबर होळी खेळले नसते, या लोकांची होळी बघून मला त्रास झाला हे अत्यंत चुकीचे आहे. असं धनंजय देशमुख यांनी म्हटलं आहे.

दरम्यान या प्रकरणातील एक आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे. पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे. मात्र त्याला पकडण्यात अद्यापही यश आलेलं नाही. यावर देखील धनंजय देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली आहे. फरार असलेला आरोपी कृष्णा आंधळे

▶▶ उर्वरित पान २ वर




## खोक्याचं घर पाडल्यामुळे भाजपचे आमदार सुरेश धस हळहळले, केला अजब दावा

**बीड । प्रतिनिधी**

मारहाण प्रकरण आणि वन्य जीवांची शिकार करणारा खोक्या उर्फ सतीश भोसले आता पोलिसांच्या ताब्यात आहे. वन विभागाच्या जागेवर तब्बल १० वर्ष घर बांधून राहणाऱ्या या खोक्याचं घर दोन दिवसांपूर्वी वनविभागाने जमीनदोस्त केलं. पण सतीश भोसलेच्या घरावर कारवाई

▶▶ उर्वरित पान २ वर



दैनिक

मराठवाडा पत्र

वर्धापन दिन

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

चर्तुथ वर्धापन दिन

**सर्वांना नमस्कार,! तुमच्या प्रतिक्रिया आमच्यासाठी महत्त्वाच्या आहेत.**

आपले दैनिक मराठवाडा पत्र येत्या ३० मार्च २०२५ ला चार वर्ष पूर्ण करत असून पाचव्या वर्षांमध्ये पदार्पण करत आहे . गेल्या चार वर्षांत आपण सर्वांनी आम्हाला भरभरून प्रेम दिले. दैनिक मराठवाडा पत्रच्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त दिनांक ३० मार्च २०२५ ला आम्ही विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेष अंकामध्ये तुमच्या प्रतिक्रिया आमच्या पुढील कार्यासाठी महत्त्वाच्या ठरतील.

आपणं आपल्या प्रतिक्रिया दिनांक २५ मार्च २०२५ पर्यंत खालील ई-मेल व मोबाईल नंबरवर पाठवाव्यात. दैनिकाबद्दल आपली प्रतिक्रिया व फोटो पाठवावा हि विनंती.

मो.क्र. ९८२२१५२९५५, Email-dailymarathwadapatra2021gmail.com

वरील नंबर व ई-मेलवर प्रतिक्रिया पाठवाव्यात.

## आम सभा ही सर्वसामान्य जनतेच्या न्यायाचे दालन आहे...

### सरपंचांनी, कार्यकर्त्यांनी जनतेची कामे करावीत.. आ.सुरेश धस यांचे प्रतिपादन

**आष्टी । प्रतिनिधी**

गेल्या आठ वर्षात आष्टी पंचायत समितीची आमसभा झालेली नाही त्यामुळे अनेक गावांमध्ये अनेक प्रकारचे प्रश्न प्रलंबित आहेत सर्वसामान्य जनतेला न्याय मिळालेला नाही आष्टी तालुक्यातील प्रलंबित असलेले सर्व घटकांतील घरकुलांची कामे गावातील शाळा खोल्यांची बांधकामे अंगणवाडी खोल्या बांधकाम जलजीवनच्या अपूर्ण योजना पूर्ण कराव्यात आणि ग्रामसेवक



तलाठी महावितरण कर्मचारी यांनी जनतेला आर्थिक वेठीला धरू नये असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले आष्टी येथील पंचायत समितीच्या आमसभेमध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर माजी आमदार साहेबराव दरेकर माजी सभापती बद्रीनाथ जगताप सरपंच परिषदेचे प्रदेश अध्यक्ष दत्ताभाऊ काकडे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी उपविभागीय अधिकारी श्रीमती व सीमा शेख तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील गट विकास अधिकारी श्री गोकुळ बागलाने बाल विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती बेल्हेकर तालुका कृषी अधिकारी गोरक्ष तरटे माजी

▶▶ उर्वरित पान २ वर

# सुनीता विल्यम्स; बिकट वाट परतीची





गेले नऊ महिने अंतराळ स्थानकामध्ये अडकून पडलेल्या भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि त्यांचे सहकारी बॅरी विल्मोर यांच्या परत येण्याचा मुहूर्त आणखी एकदा हुकला आहे. 'नासा' आणि एलन म स्क यांची 'स्पेस एक्स' यांनी आखलेल्या संयुक्त मोहिमेम ध्ये 'क्रू १०' या रॉकेटचे बुधवारी उड्डाण होणार होते. दोन अमेरिकी, तसेच एक जपान आणि एक रशियाचा अंतराळवीर या मोहिमेत रवाना होणार होते; मात्र तांत्रिक अडचणींमुळे ही मोहीम लांबणीवर पडली. आता पुढील आठवड्यात पुन्हा हे उड्डाण होण्याची चर्चा आहे; परंतु त्याबाबत निश्चितता नसल्याने विल्यम्स यांच्या परतण्याची आणखी प्रतीक्षा करावी लागेल काय, अशी चिंता आहे. गेल्या वर्षी पाच जून रोजी 'नासा'च्या मोहिमेअंतर्गत विल्यम्स आणि विल्मोर हे अंतराळवीर आठ दिवसांच्या अवकाशयात्रेसाठी रवाना झाले. मात्र, त्यासाठी येणाऱ्या यानामध्ये काही बिघाड दिसून आल्याने त्यांचे परतणे लांबणीवर पडले. त्यानंतर गेले नऊ महिने हे दोघेही अंतराळ स्थानकातच आहेत. या काळात सुनीता यांनी अंतराळात काही विषयांवरील प्रयोगांत सहभाग घेतला; तसेच तांत्रिक देखभाल, स्पेसवॉकही केला. त्याबरोबर तेथून त्या नियमित संपर्कात आहेत.

साठ वर्षांच्या सुनीता यांना वेगवेगळ्या प्रकारच्या उड्डाणांचा तीन हजार तासांहून अधिक अनुभव आहे. त्यांचे शिक्षण व अनुभव पाहून अंतराळ मोहिमेसाठी त्यांची निवड झाली. त्यानंतर त्यांनी अंतराळवीर म्हणूनही अनेक महत्त्वपूर्ण मोहिमांत सहभाग घेतला. गेल्या नऊ महिन्यांत अमेरिकेतही या दोन अंतराळवीरांच्या मुद्द्यावरून मोठे राजकारण झाले. नवे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी माजी अध्यक्ष जो बायडेन हे दोघांना परत आणण्यासाठी पावले उचलत नसल्याची टीका केली आणि सहकारी एलन मस्क यांच्यावर ती जबाबदारी सोपविली होती. मस्क यांनीही यापूर्वी आपण 'स्पेस एक्स'मार्फत दोघांना आणण्याची तयारी दर्शविली; मात्र बायडेन यांनी त्यास मान्यता न दिल्याचा आरोप केला आहे. आता ट्रम्प यांच्या सत्ताकाळात नासा व स्पेसएक्सने नव्याने म ोहीम आखली आहे.

आता पुढील आठवड्यात त्यांना घेण्यासाठी निघणाऱ्या रॉकेटचे उड्डाण झाले नाही, तर हवामानासह अनेक प्रतिकूल बाबींचा सामना करावा लागेल आणि ही मोहीम आणखी लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. अशा काळात अमेरिकी तंत्रज्ञांची मात्र कसोटी लागणार आहे. त्यांच्या सुरक्षित परतण्यासाठी भारतीय आणि अमेरिकी नागरिकही सदिच्छा व्यक्त करत आहेत.

# विना गॅरंटी सरकार देतंय लाखोंचं कर्ज

## घरबसल्या असा करा अर्ज अन् पूर्ण करा व्यावसायिक होण्याचे स्वप्न

प्रत्येक व्यक्तीला एकतर चांगली नोकरी हवी असते किंवा चांगला व्यवसाय करायचा असतो. परंतु, व्यवसाय करण्यासाठी पैशांची गरज असते आणि अनेक वेळा लोकांना पैशाचे व्यवस्थापन करणे कठीण होऊन बसते आणि त्यांच्या आर्थिक अडचणी संपत नाहीत. केंद्र सरकार सर्व घटकांना लक्षात ठेवून अनेक योजना राबवते, जेणेंकडून लोकांना आर्थिक मदत दिली जाईल.

यापैकी एक म्हणजे प्रधानमंत्री मुद्रा योजना (PM् मुद्रा योजना), जी लघुउद्योग सुरू करण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत लोकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे जर तुम्हालापण स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा असेल तर तुम्ही सरकारकडून १० लाख रुपयांपर्यंत कर्ज घेऊ शकता. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सरकारने २०१५ मध्ये प्रधानमंत्री मुद्रा योजना किंवा झचचध ही योजना, बिगर कृषी लघु/सूक्ष्म आणि गैर-कॉर्पोरेट उद्योगांना समर्थन देण्यासाठी १० लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू केली होती.





सरकारी योजनेत हमीशिवाय कर्ज मिळेल- पंतप्रधान मुद्रा योजनेतून कर्जाचा लाभ घेण्यासाठी कोणत्याही प्रकारची हमी देण्याची गरज नाही. म्हणजेच मुद्रा योजनेअंतर्गत हमीशिवाय कर्ज उपलब्ध असून कर्जासाठी कोणतेही प्रोसेसिंग शुल्क लागू पडणार नाही आणि मुद्रा योजनेअंतर्गत तुम्ही कर्जाच्या परतफेडीचा कालावधी ५ वर्षांपर्यंत वाढवता येतो. तसेच योजनेअंतर्गत कोणताही निश्चित व्याजदर नसल्यामुळे वेगवेगळ्या बँका वेगवेगळे व्याजदर आकारू शकतात. साधारणपणे किमान व्याज दर १० ते १२% असू शकतो.

अचानक पैशांची गरज भासली? पर्सनल लोन की सुरक्षित कर्ज, काय फरक आहे जाणून घ्या

मुद्रा योजनेत कोणाला अन् कुठून मिळते कर्ज?

छोटे उद्योग सुरू करण्यासाठीही या योजनेतून लोकांना कर्ज उपलब्ध दिले जात असून मधमाशी पालन, मत्स्यपालन, कुक्कुटपालन इत्यादी शेतीशी संबंधित कामांसाठी देखील मुद्रा योजनेत कर्ज घेतले जाऊ शकते. तुम्हाला गरज असल्यास तुम्ही झचचध पोर्टलद्वारे कर्जासाठी ऑनलाइन अर्ज करू शकतात. प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील बँका, सहकारी बँका, ग्रामीण बँका आणि इतर कर्ज देणाऱ्या संस्थांकडून कर्ज उपलब्ध होऊ शकते.

घर किंवा कारसाठी कर्ज घेतले पण हप्ते थकले वा फेडता येत नसेल तर होऊ शकते नुकसान, जाणून घ्या

PMMY आवश्यक कागदपत्रे आणि पात्रता

इच्छुक अर्जदार या योजनेंतर्गत ऑफलाइन किंवा ऑनलाइन अर्ज करू शकतात. ऑफलाइन तुम्ही कोणत्याही कर्ज देणाऱ्या संस्थेशी (बँक/वित्तीय संस्था) संपर्क साधू शकता, तर ऑनलाइन अर्जासाठी अधिकृत वेबसाइट ु. ंवूराळाळीीर.ळप ला भेट द्या. या योजनेतून कर्ज घेण्यासाठी उद्योजकाचे वय २४ ते ७० वयोगटातील असले पाहिजे. तसेच कर्ज मिळविण्यासाठी आधार कार्ड/पॅन/पासपोर्ट/मतदार आयडी सारखा केवायसी पुरावा असणे आवश्यक आहे.

पान ४ वरून पुढे...

## किती विनाअनुदानित...

१००% अनुदान देण्यापासून वंचित ठेवले आहे. सध्या जे शिक्षक २०% ४०% ६०% टक्के अनुदानावर काम करत आहेत. त्या शिक्षकांना पुढील वाढीव टप्पा अनुदान मिळावे यासाठी या सर्व शिक्षकांनी मागच्या वर्षी तब्बल पाच ते सहा महिने सातत्याने आंदोलन केले. तेव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने आचारसंहिता लागण्यापूर्वी या सर्व शिक्षकांना वाढीव टप्पा अनुदान घोषित केले. तसेच या संदर्भात १० ऑक्टोबर २०२४ रोजी शासन आदेश काढला. परंतु अद्यापही वाढीव टप्पा अनुदानासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद केली नाही. त्यामुळे अनुदानाचा टप्पा वाढला असला तरी अद्याप शिक्षकांच्या वेतनात वाढ झाली नाही. त्यामुळे वाढीव टप्पा अनुदानापासून हे सर्व शिक्षक वंचित राहिले आहेत. सरकारच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये वाढीव टप्पा अनुदानासाठी लागणाऱ्या आर्थिक निधीची तरतूद होईल असे वाटत होते. परंतु निधीची तरतूद न झाल्यामुळे या शिक्षकांच्या पदरी निराशा आली. एकीकडे अनुदान नाही दुसरीकडे

कुटुंबांचा खर्च भागविणे अवघड होत चालले आहे. त्यामुळे हे सर्व शिक्षक चिंताग्रस्त झाले आहे.

निराशाच्या गर्गेत जीवन जगत आहेत. या निराशेतूनच काल बीड जिल्ह्यातील एका विनाअनुदान शाळेत काम करणाऱ्या धनंजय नागरगोजे नावाच्या शिक्षकांनी आत्महत्ये सारखे टोकाचे पाऊल उचलले. सरकारने जर जाहीर केलेल्या वाढीव टप्पा अनुदानासाठी लागणाऱ्या आर्थिक निधीची तरतूद केली असती तर धनंजय नागरगोजे यांचा जीव वाचला असता. एकंदरीत या सरकारला विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या बाबतीत गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे.

विविध टप्प्यावर काम करत असणाऱ्या शिक्षकांना शंभर टक्के अनुदान कधी देणार? अजून किती विना अनुदानित शिक्षकांचा बळी गेल्यावर सरकार विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या पगारासाठी लागणारी आर्थिक तरतूद करणार ? तसेच या सरकारला अजून किती शिक्षकांचा बळी घ्यायचा ? असा संतप्त सवाल

मराठवाडा विभागाचे विभागीय अध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे निरीक्षक विजयसिंह शिंदे महिला संघटनेच्या महिला आघाडीच्या मराठवाडा संघटक मुक्ता मोटे, दैवशाला मुंडे, सुरेखा गायकवाड मॅडम, मस्के मॅडम, बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, जिल्ह्याचे पदाधिकारी सौंदलकर, शेख, जिल्हा उपाध्यक्ष रामदास जामकर, पंकज कळसकर, बीड तालुकाध्यक्ष भागवत यादव, वडवणी तालुका अध्यक्ष वैजिनाथ शिंदे, गेवराई तालुका अध्यक्ष दीपक गरूड, आष्टी तालुका अध्यक्ष रविंद्र भुकन, पठाण, मोरे , गवळी, बाळासाहेब नागरगोजे, प्रताप देशमुख, श्रीराम जाधव, गोविंद आघाव, भालके, सुरेश कदम, जावेद पठाण, मुंडे यांच्यासह आदींनी उपस्थित केला आहे. दरम्यान तातडीने वाढीव टप्पा अनुदानासाठी भरीव आर्थिक तरतूद करावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने देण्यात आला.

## मानसाने पाप कर्म...

पाहिजे तसेच मानुष्या ची वानी शुद्ध व पवित्र आसली पाहीजे. तर या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभे च्या जिल्हा संस्कार उपाध्यक्ष आद. लिलाताई उजगरे, जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे, जिल्हा पर्यटन सचिव आद.के व्ही साळवे ,एन बी राजभोज, आंगनवाडी परिवेक्षिका मोरे ताई , शिवाजी मोरे हे उपस्तीत होते या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तालुका सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गुलाब धाईजे,निितिन डोंगरे, दयानंद साळवे,मोहन काकडे, बाबासाहेब घनघाव,गणपत भालेराव,डी पी वाघमारे,डी पी पोटभरे,बळीराम काकडे,शरद उजगरे,संभाजी धाईजे,रमाताई राजभोज,पोहरेताई, गायसम ुद्रेताई ,यांनी परिश्रम घेतले

पान १ वरून पुढे...

## संस्थाचालकाच्या जाचाला..

आश्रम शाळेमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत होता. सदरील शिक्षक हा गेल्या अनेक वर्षांपासून विना अनुदान तत्वावर कार्यरत होता. सरकारने २०१९ साली २० टक्के अनुदान देण्याची घोषणा केली होती. मात्र ते अनुदान सुरू झाले नाही . गेल्या अनेक वर्षांपासून अनुदान नसतानाही विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम करणार्या शिक्षकाने अखेर आपली जीवनयात्रा संपवली.

संस्थाचालक विक्रम मुंडे यांच्या संस्थेवर अठरा वर्षांपासून नोकरीस असलेल्या नागरगोजे यांना पगार मिळतं नव्हता. अनेकवेळा मुंडे व त्यांच्या मुलाला भेटून विचारणा केली, मात्र त्यांनी याकडे दुर्लक्ष केले. मला पगार द्या नाहीतर आत्महत्या केल्याशिवाय पर्याय नाही असे म्हटल्यानंतर टू मर म्हणजे आम्हाला तुझ्या जागेवर दुसऱ्या माणसाला घेता येईल असे उत्तर दिल्याचे नागरगोजे यांनी फेसबुक पोस्टमध्ये म्हटले आहे.

## '.तर न्यायाधीश ...

सापडल्यानंतर या प्रकरणातील अनेक बाबी समोर येणार आहेत. आरोपी जर लवकर नाही सापडला तर मी काहीतरी वेगळा निर्णय घेणार आहे. फरार आरोपीकडील माहिती पुरावे त्यानी नष्ट केले तर त्याला जिम्मेदार कोण असणार? असा प्रश्नही यावेळी धनंजय देशमुख यांनी उपस्थित केला आहे.

काय आहे अंजली दमानियांचा दावा ?- अंजली दमानिया यांनी ट्विट करत असा दावा केला होता की, केजला होळीचा कार्यक्रम असताना तिथे राजेश पाटील जे एक निलंबित अधिकारी आहेत आणि दुसरे प्रशांत महाजन हे दोन्ही अधिकारी आले आहेत. ते सत्र न्यायालयाच्या न्यायाधीशांसोबत होळी खेळताना दिसतात. हे बघितल्यावर मला अतिशय धक्का बसला.

## खोक्याचं घर...

ही घाईने केली, अशी प्रतिक्रिया भाजपचे आमदार सुरेश धस यांनी दिली. बीडमध्ये एका व्यक्तीला अमानुषपणे मारहाण केल्याच्या प्रकरणी सतीश भोसले पोलिसांच्या ताब्यात आहे. या प्रकरणानंतर खोक्याचे अनेक प्रकरण समोर आली आहे. बीडमध्ये तर या खोक्याने वनविभागाच्या जागेवर आलिशान घर बांधलं होतं. त्याच्या घरावर कारवाईनंतर सुरेश धस यांनी प्रतिक्रिया दिली. सतीश भोसले याचे घर पाडण्यासाठी अति घाई केली. या प्रकरणाची मी माहिती घेत असून काही जणांचे म्हणणे, सतीश भोसलेची जमीन वनविभागाची तर काहींचं म्हणणं ती जमीन वाटप करण्यात आली आहे. मात्र उद्या मी त्या ठिकाणी जाणार असून माहिती घेईल. सतीश भोसले याचे घर पाडण्यासाठी अति जास्त घाई केली. असं म्हणत याबाबत कलेक्टर आणि वनविभागाला विचारणा करणार असल्याचं धस यांनी म्हटलं आहे.

मारहाण केलेल्या ठिकाणी खोक्याची परेड-

दरम्यान, आज शनिवारी सतीश उर्फ खोक्या भोसलेला घेऊन शिरूर पोलीस घटनास्थळी दाखल झालं होतं. बावी गावात ढाकणे पिता पुत्रांना अमानुष मारहाण केल्याप्रकरणी सतीश भोसले ऊर्फ खोक्याला सात दिवसांची पोलीस कोठडी मिळालीये. आता ज्या ठिकाणी मारहाण झाली होती, त्या ठिकाणी तपास करण्यासाठी पोलीस खोक्याला घेऊन गेले होते. शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश धोक्रट घेऊन गेले आहेत. ज्या ठिकाणी मारहाण झाली होती, त्या ठिकाणची पाहणी करण्यात येत आली. सतीश उर्फ खोक्या भोसलेने १९ फेब्रुवारी २०२५ रोजी ढाकणे पिता-पुत्रांना बावी परिसरातील डोंगर पट्ट्यांमध्ये मारहाण केली होती, अशी तक्रार शिरूर पोलीस ठाण्यामध्ये दाखल करण्यात आली. यानंतर खोक्याच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या. काल त्याला न्यायालयाम ध्ये हजर करण्यात आले होतं. युक्तिवादादरम्यान त्याला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## आम सभा ही...

उपसभापती रंगनाथ धोंडे एनटी गर्जे परमेश्वर शेळके नगराध्यक्ष जिया बेग, शिराळ येथील प्रगतीशील शेतकरी गौतम नाना आजबे, कल्याण काका काकडे, शिराळचे माजी सरपंच बंडू आबा आजबे, आदी उपस्थित होते पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की घरकुल योजनेतल्या सर्व योजनांच्या लाभार्थ्यांना तत्काळ घरे मंजूर करून त्यांना निवारा निर्माण करून द्यावा त्यामध्ये प्रामुख्याने भटके विमुक्त आदिवासी पारधी मायक्रोमायनॉरिटी यांचा प्राधान्याने विचार करावा. सरपंचांनी कार्यकर्त्यांनी गावांमधील जिल्हा परिषदेच्या शाळा खोल्या बांधकामाकडे लक्ष द्यावे अंगणवाडी बांधकामाकडे लक्ष द्यावे भटक्या विमुक्तांच्या स्मशानभूमी बांधकामे करण्यात यावीत कारण अनेक ठिकाणी ही कामे अपूर्ण असल्याचे दिसून येत आहे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत जलसिंचन विहिरींमध्ये गट विकास अधिकारी यांनी नियम ात बसत असलेल्या ३२ ९५ जलसिंचन विहिरींची कामे तात्काळ सुरू करावीत गेल्या दहा वर्षांत आष्टी मतदार संघात कोणत्याही वैयक्तिक लाभाच्या योजनेचा योजनेचा प्रस्ताव बनविण्यापासून शिक्का मारेपर्यंत एजंट ची साखळी तयार झाली ही बंद करून,आता कोणत्याही शासकीय कार्यालयात वैयक्तीक लाभासाठी कुणाकडून पैसे घेतले तर कोणत्याच अधिका-यांची गया केली जाणार नाही जर कुणी अधिकारी पैसे मागतांना आढळून आला तर त्याच्यावर कारवाई करण्यात येईल असा इशारा त्यांनी यावेळी दिला जलजीवन मिशन अंतर्गत अनेक योजना मंजूर झाल्या असून या सर्व योजनांच्या ज्या ठिकाणी अडचणी असतील त्याच्यासाठी सुधारित अंदाजपत्रके करण्यात यावीत आपण ती लवकरात लवकर मंजूर करून घेऊ असे सांगत अंगणवाडी सेविका आणि कार्यकर्त्या यांच्या रिक्त जागा तात्काळ भराव्यात त्यासाठी कोणाच्याही शिफारशीची आवश्यकता नाही नियमाप्रमाणे नेमणूक कराव्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत तहसील कार्यालयामार्फत करण्यात आलेली अनेक रस्ता कामे ही एकाच अंतरात दोन दोन कामे करून भ्रष्टाचार करण्यात आल्याचे तक्रारी आहेत त्यामुळे तहसीलदार यांनी या सर्व तक्रारीची चौकशी झाल्याशिवाय कुशल मजुरीचे पैसे अदा करू नयेत असे सांगून यासाठी कोणताही भेदभाव करू नका कोणी जरी असेल तरी सर्वांसाठी एकच भूमिका ठेवा असे सांगितले स्वस्त धान्य दुकानदारांच्या तक्रारी असतील तर त्यांचे परवाने रद्द करा सुरत चेन्नई हा राष्ट्रीय महामार्ग ३८ किलोमीटर आष्टी तालुक्यातून जात आहे या सर्व शेतकऱ्यांच्या जमिनी बागायत असून देखील त्यांची जिराईत म्हणून नोंद झालेली आहे त्या सर्व बागायती म्हणून करण्यात याव्यात याबाबतही कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले

आष्टी तालुक्यातील शेती विद्युत पंपासाठी ट्रान्सफॉर्मर्स पुरेसे उपलब्ध करून देण्यात आले असून आणखीही आवश्यकता भासल्यास ट्रान्सफॉर्मर देण्यात येतील परंतु आता शेती पंपासाठी वीज मोफत असल्यामुळे ग्रामीण भागातील घरगुती वीज जोडण्याची संख्या वाढली पाहिजे यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे अनधिकृत आकड्यांमुळे अनेक ठिकाणी अनेकांना प्राण गमवावे लागले आहेत हे दुर्दैवी आहे त्यामुळे वीज कनेक्शन अधिकृतपणे करून घ्यावीत असे आवाहन करून आमदार सुरेश धस पुढे म्हणाले की पुढील काळामध्ये दिवसा बारा तास पुरेशा दाबाने वीज उपलब्ध होईल यासाठी आपण प्रयत्न करणार असून लवकरच टाकळी आम्ही या येथे २२० के.व्ही. वीज उपकेंद्र मंजूर झाले असून लवकरच विजेचा प्रश्न सुटणार आहे कांदा चाळ ही सामूहिक पद्धतीने करावी असे शासनाचे निर्देश आहेत परंतु ग्रामीण भागामध्ये यामध्ये अडचणी येत असल्यामुळे लवकरच आपण वैयक्तिक लाभाच्या कांदा चाळी मंजुरीसाठी मंत्री महोदयांची भेट घेणार आहोत मनरेगातूनच बांबू लागवड ही कामे करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे वाळू उपशावर बंधन असले तरी शासकीय इमारतींच्या बांधकामासाठी वाळू उपलब्ध करून द्यावी लागणार आहे त्यामुळे तहसीलदार यांनी या कामी लक्ष घालावे असेही शेवटी आम दार सुरेश धस यांनी सांगितले यावेळी शेरी बुद्रुक येथील सरपंच संदीप खकाळ यांनी मस्साजोग चे सरपंच संतोष यांच्या निर्गुण हत्याप्रकरणी आमदार सुरेश धस यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्यभर आवाज उठवला त्याबद्दल त्यांच्या अभिनंदनचा ठराव मांडला तो सर्वांमध्ये मंजूर करण्यात आला गेल्या सात वर्षांनंतर पहिल्यांदाच आष्टी पंचायत समितीच्या प्रांगणात शनिवार (दि.१५) रोजी आयोजित करण्यात आली होती.

यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर,उपविभागीय अधिकारी वसिमा शेख, तहसिलदार वैशाली पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिति सभापती रमजान तांबोळी, सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, माजी पंचायत समिती सभापती बद्रीनाथ जगताप,आष्टी नगर पंचायत नगराध्यक्ष जिया बेग,एन.टी.गर्जे,परमेश्वर शेळके, यांच्यासह आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. माजी आमदार साहेबराव दरेकर म्हणाले,प्रत्येक गावचे तलाठी,ग्रामसेवक यांनी सजावर उपलब्ध राहावे,तलावातील पाणी पुढील दुष्काळाची दाहकता ओळखुन राखीव ठेवावे, तसेच साबलखेड,आष्टी रस्त्यांचे काम लवकर पुर्ण करावे,पंचायत समितीमध्ये दलालांची संख्या जास्त झाली असल्याची खंत माजी आ.दरेकर यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने यांनी केले.सुरूवातीला पिंपरी घुमरीचे सरपंच यांनी ग्रामिण भागातील घरकुल साठी वाढीव अनुदान किती मिळणार व कडा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये माल टाकूनही आम्हाला दोन दोन वर्ष पट्टी मिळत नाही यावर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी यांनी आपण बाजार समितीची बदनामी न करता रितसर तक्रार द्या यावर आम्ही दोन दिवसांत प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. नगराध्यक्ष जिया बेग यांनी नगर पंचायत अंतर्गत शेतक-यांना वैयक्तीक लाभ विहीर, शेत तलाव या योजनेचा लाभ मिळत आहे.तरी याबाबत शासन दरबारी पाठपुरवठा करावा आणि शहरासाठी रूटी प्रकल्पातुन सोडलेले पाणि बंद करून आष्टी,मुर्शदपुर शहरासाठी हे पाणि राखीव ठेवा अशी मागणीही त्यांनी केली.या आमसभेत दादासाहेब पाडुंळे, परिवंत गायकवाड,यशवंत खंडागळे,अनिल ढोबळे,बापुराव ससाणे,युवराज शिंदे ,शरद खांडवे,जाधव,रामा काशिद,बाळासाहेब बांगर, परमेश्वर घोडके,हनुमंत जेवे,बाळासाहेब खिळे,दत्तोबा वाडेकर, आत्माराम फ ुंदे,विजय डुकरे,अंगद शिंदे, शिवाजी गर्जे,धनजंय तरटे,सागर आमले यांच्यासह शेकडो नागरिकांनी आपले गा-हाणे या आमसभेत मांडले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

CMYK

दैनिक मराठवाडा पत्र | संमिश्र | रविवार, दि. १६ मार्च २०२५



# श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे श्रीसंत एकनाथ महाराज षष्ठी निमित्त प्रस्थान





**लिंबागणेश । प्रतिनिधी**

श्री गुरू ईश्वर बाबा भारती श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे श्रीसंत शांती ब्रम्ह एकनाथ महाराज षष्ठी निमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थान ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन मठाधिपती ह.भ.प.महादेव बाबा भारती महाराज आणि ह.भ.प. शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. काल दि.१४ शुक्रवार रोजी सकाळी श्रीक्षेत्र बेलेश्वर व श्रीगुरु ईश्वर बाबा भारती यांचा अभिषेक करून पायी दिंडीचे प्रस्थान झाले. पायीदिंडींचे हे ११ वे वर्ष असुन मोठ्या संख्येने भाविक यात सहभागी झाले आहेत. टाळ मृदंगाच्या गजरात ग्यानबा तुकाराम च्या नामघोषात दंग दिंडीतील भाविकांचे दिंडी मार्गावरील भाविकांनी आकर्षक फुलांनी सजवलेल्या रथामध्ये विराजमान महंत महादेव भारती महाराज व शांती ब्रम्ह तुकाराम महाराज यांची ठिकठिकाणी आतषबाजी करत, सडासमार्जन, रांगोळी काढून सुवासिनींनी पाद्यपुजन करत औक्षण करत मनोभावे स्वागत केले. ग्रामस्थांनी दिंडीतील भाविकांची ठिकठिकाणी चहा पाणी,लिंबु सरबत,नाष्टा यांची सोय करण्यात आली होती.काल दुपारच्या भोजणाची पंगत पिंपरनई ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली होती. त्यानंतर पायी दिंडी मुक्कामी बेलखंडी गावाकडे मार्गस्थ झाली. पायी दिंडी सोहळा १४ मार्च ते २२ मार्च दरम्यान होत असुन पायीदिंडी बेलखंडी,बेलुरा,फुल सांगवी,अर्धपिंपरी,मुंगी, याठिकाणीहुन मार्गक्रमण करत दि.२१ मार्च रोजी पैठण येथे मुक्कामी पोहोचणार आहे.दि.२२ मार्च रोजी ह.भ.प. शांतीब्रम्ह तुकाराम महाराज बेलेश्वर संस्थान बेलगाव यांच्या काल्याच्या किर्तनाने सोहळ्याची सांगता होणार आहे.नाथषष्ठी सोहळ्यात भजन, किर्तन,भारूड, संगीत भजन आदी कार्यक्रमांची मेजवानी असते. भाविकांच्या जेवणाची आणि मोफत जेवणाची सोय संस्थानच्या वतीने केली जाते. शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या अथक प्रयत्नाने पायी दिंडी सोहळ्याला वेगळे स्वरूप आले असुन पायीदिंडीत सहभागी होणाऱ्या पंचक्रोशीतील भाविकांचा सहभाग उत्तरोत्तर वाढत आहे.

## भगवंताच्या नामस्मरणाच्या रंगात रंगून जा-ह भ प भरत महाराज साळुंके



**बीड । प्रतिनिधी**

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या ३७५ व्या बीज उत्सवानिमित्त खर्डेवाडी येथे श्रीमद संगीत भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा व त्रिदिवसीय कीर्तन महोत्सवातील पहिल्या दिवशीच्या सेवेमध्ये भरत साळुंके महाराजांनी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा

श्रश्ररंगी रंगला श्रीरंग हा अभंग घेतला होता या अभंगावर भाष्य करताना भरत महाराज म्हणाले की मानवी जीवन जगत असताना इतर कुठल्याही नश्वर रंगाच्या पाठीमागे लागून रंगण्यापेक्षा भगवंताची तन-मन-धनाने भक्ती करून ईश्वराच्या रंगांमध्ये रंगून जा यामुळे आपल्या जीवनाचे सार्थक होईल असा अनमोल सल्ला महाराजांनी आपल्या प्रथम सेवेच्या पुष्प गुंफतांना व्यक्त केले

सविस्तर चिंतनामध्ये महाराजांनी सांगितले की आपले पत्नी, मुले, धनदौलत ही नष्ट होणारी आहे कधीही न चोरी जाणार धन म्हणजे परमार्थ

परमार्थ महाजन जोडी देवाची चरण

सेवा होय आपल्या हाताने केलेले दान आणि स्वतः केलेलं भगवंताचे चिंतन म्हणून हे वाया जात नाही शेवटच्या घडीला फक्त आणि फक्त देवाचंच नाम कामी येतं असं महाराज म्हणाले या कीर्तन सेवेसाठी ज्ञानराज वारकरी शिक्षण संस्था मंठाचे ह भ प व गायक स्वर सम्राट परमेश्वर महाराज आतकरीआणि उत्कृष्ट पखवाज वादक अंकुश महाराज खराबे हे उपस्थित होते कीर्तन श्रवण करण्यासाठी परिसरातील भावीकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते

## र.भ. अट्टल महाविद्यालयात पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**गेवराई । प्रतिनिधी**

बीड जिल्हयातील बेरोजगार सुशिक्षित उमेदवारांना स्थानिक ठिकाणी रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरिता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, बीड आणि र. भ. अट्टल महाविदयालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १८ मार्च २०२५ रोजी र. भ. अट्टल महाविदयालय, पंचायत समिती समोर, गेवराई जिल्हा बीड येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सदर मेळाव्यामध्ये पुढिलप्रमाणे नांमाकित कंपनीच्या वतीने बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी मिळावी याकरिता प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येणार आहेत. राजयोग मोटार्स बीड येथे १)सुपरवायजर एकूण पदे-०४ शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन मेक. इंजिनिअरिंग डिप्लोमा इन इले. इंजिनिअरिंग वयोमर्यादा-१८ ते २५ २)मेकॅनिक एकुण पदे-०४ शैक्षणिक पात्रता- आय.टी.आय इलेक्ट्रीकल आय. टी.आय इलेक्ट्रॉनिक वयोमर्यादा-१८ ते २५ ३)हेल्पर- एकुण पदे-०४ शैक्षणिक पात्रता- आय.टी.आय इलेक्ट्रीकल एल आय सी बीड, येथे विमा सखी एकूण पदे- ५० शैक्षणिक पात्रता- १० वी/ १२ वी वयोमर्यादा-१८ ते ४५ इंन्स्पाअर इंग्लिश स्कुल गेवराई येथे

१) व्हाईस प्रिनसिपल एकुण पदे ०१ शैक्षणिक पात्रता- ग्रॅज्युएट,बी.एड अनुभव ५ वर्षे

२) अकाऊंटंट / क्लार्क एकुण पदे ०२ शैक्षणिक पात्रता-बी.कॉम/एम.कॉम/टॅली अनुभव २ वर्षे

३) प्राथमिक शिक्षक- एकुण पदे ११ शैक्षणिक पात्रता- डी.एड./बी.एड (इंग्रजी) वयोमर्यादा-२५ ते ३५

दिशा सेक्युरिटिज संभाजीनगर येथे

१) टेक्निशिअन-एकुण पदे २० शैक्षणिक पात्रता- आय.टी.आय टर्नर, फिटर,वेल्डर, वयोमर्यादा- १८ ते ३५

२) हेल्पर- एकुण पदे १६ शैक्षणिक पात्रता-१० वी १२ वी उत्तीर्ण वयोमर्यादा-१८ ते ३५

३) सुरक्षा रक्षक एकुण पदे-२० शैक्षणिक पात्रता-१० वी १२ वी उत्तीर्ण वयोमर्यादा-१८ ते ३५

जॉब लोकेशन- छ. संभाजीनगर गोविंदाज प्रा.लिमिटेड नाशिक येथे ट्रेनी या पदाची एकुण पदे-५० शैक्षणिक पात्रता- १२ वी/पदवी वयोमर्यादा- १८ ते ३५ जॉब लोकेशन- छ.संभाजी नगर/बीड/ नाशिक

नवकिसान बायो प्लॅन्ट टेक लि.येथे

सेल्स ट्रेनी-या पदाची एकुण पदे-३० शैक्षणिक पात्रता- दहावी/ बारावी/ पदवी उत्तीर्ण वयोमर्यादा १८ ते ३५ जॉब लोकेशन-छ. संभाजी नगर / नांदेड

ब्रिजयोग टोयोटा बीड येथे

सुपरवायजर/सेल्स रिप्रेजेंटेटिव्ह एकूण पदे-१० शैक्षणिक पात्रता- १२ वी/पदवी वयोमर्यादा-१८ ते ३०

एस जि सॉफ्टवेअर येथे

मार्केट डेवलपमेंट एक्सझिकेटीव एकूण पदे-१० शैक्षणिक पात्रता- १२ वी/ पदवी वयोमर्यादा-१८ ते ३०

बजाज टो लि.संभाजीनगर

डि.टी.ई. एकूण पदे-५० शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन इंजिनिअरींग/पदवी वयोमर्यादा-१८ ते २४

भारती बांगर इंग्लिश स्कुल गेवराई येथे प्राथमिक शिक्षक- एकुण पदे ०२ शैक्षणिक पात्रता- डी.एड/बी.एड (इंग्रजी) वयोमर्यादा-२१ ते २८

टाटा इन्शुरन्स बीड येथे इन्शुरन्स डवायजर/ बिजनेस असोसिएट-एकुण पदे-५० शैक्षणिक पात्रता- बारावी / पदवी उत्तीर्ण वयोमर्यादा १८ ते ४०

आय.टी.एम.स्किल्स ॲकॅडमी पुणे येथे रिलेशनशिप मॅनेजर एकुण पदे-५० शैक्षणिक पात्रता- वयोमर्यादा १८ ते ३० जॉब लोकेशन- महाराष्ट्र ग्रीवज कॉटन छ. संभाजी नगर येथे

ट्रेनि इंजीनियर एकूण पदे-५० शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन इंजिनिअरींग/ पदवी वयोमर्यादा-१८ ते २४दि. १८ मार्च २०२५ र.भ.अट्टल महाविदयालय, पंचायत समिती समोर, गेवराई येथे प्रत्यक्ष मुलाखतीस येऊन संधीचा लाभ घ्यावा, रोजगार मेळाव्यास येताना आवश्यक कागदपत्रे सोबत आणावी. या बाबत काही अडचणी असल्यास या कार्यालयाचे श्री. इंगोले यांना ९८२२७८१८७६ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा तसेच इशशव ड्ज्ञळश्रश्र या फेसबुक पेजला फॉलो व लाईक करावे असे आवाहन श्री. सुशिल उचले, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, बीड यांनी केले आहे.

## सौ.के.एस.के. कृषि महाविद्यालय बीड येथील विद्यार्थिनी आश्लेषा विनोद वाकडे बनली ड्रोन पायलट

**बीड । प्रतिनिधी**

सौ.के.एस. के. (काकू) कृषि महाविद्यालय बीड येथील विद्यार्थिनी अश्लेषा विनोद वाकड़े ही ड्रोन पायलट बनली आहे. महाविद्यालयात कृषीचे शिक्षण घेत असतानाच समाजसेवेची आवड असल्यामुळे समाज उपयोगी कही करायचे ह्या विचाराने प्रेरित झाल्यामुळे आणि चिकित्सक बुद्धि ह्यद्वारे ड्रोन बद्दलचे शिक्षण घेऊन ड्रोन पायलट हे नाव साकार केले..कृषीमध्ये यांत्रिकीकरणाचा वापर वाढविणेकरिता केंद्र व राज्य शासन विविध योजनांच्या माध्यमातून प्रोत्साहनात्मक अनुदान देत आहे. ड्रोनव्दारे विविध खरिप, रब्बी, फळपिके तसेच भाजीपाला पिकावर किटकनाशकाची फवारणी सुलभरित्या करता येते. मात्र, योग्यरित्या ड्रोन चालवू शकतील, असे प्रशिक्षित मनुष्यबळ पुरेशा प्रमाणात आज उपलब्ध नाही.



ह्याच गोष्टीचा विचार करुन सौ. के. एस. के. (काकू) कृषि महाविद्यालय, बीड येथील विद्यार्थिनी अश्लेषा विनोद वाकडे हिने छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे प्रायोजित महात्मा फुले कृषी राहुरी विद्यापीठ अंतर्गत रिमोट पायलट प्रशिक्षण संस्थेमार्फत ड्रोन पायलटप्रशिक्षण पुर्ण करुन रिमोटपायलट प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. प्रशिक्षण प्राप्त करुन न थांबता या विद्यार्थ्यांनीने परिसरातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून शेती मध्ये ड्रोन द्वारे फवारणी करण्यासाठी ड्रोन खरेदी केले आहे. एवढ्या वर च न थंबता त्यांच्या परिसरातील आणि महाविद्यालयतिल विद्यार्थ्यांना त्यांच्या ड्रोन पायलट ह्या विषयी असलेले मार्गदर्शन करुन अजुन ड्रोन वपरबद्दल जनजागृति घडवयाचा त्यांच्या मानस आहे.. आणि त्यांच्या ड्रोन विषयी असलेल्या माहिती च्या आधारे शेती मध्ये नवीन technology वापरून कमी ख़र्चत जास्त उतपन्न कसे घडेल ह्यबद्दल त्यांच्या परिसरातील शेतकऱ्यांना लाभ व्हावा ह्यसाठी पुढाकार घेण्याचा त्यांच संकल्प आहे त्यांच्या ह्या यश मध्ये त्यांना महाविद्यालय चे जी.ही .साळुंके सर तसेचं मुख्याध्यापक एस .पी .मोरे सर मार्गदर्शन लाभले

## निधन वार्ता



### सौ. दुर्गाबाई जाब्रस

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील झेंडा चौक भागातील रहिवासी असलेल्या सौ. दुर्गाबाई चंद्रकांतराव जाब्रस वय ७५ वर्षे यांचे वृद्धापकाळाने दि. १४ शुक्रवारी पहाटे निधन झाले. सौ. दुर्गाबाई जाब्रस या अतिशय प्रेमळ व शांत स्वभावाच्या असल्याने त्या सर्व परिचित होत्या. त्यांच्या निधनाने हळहळ करण्यात येत आहे. त्यांच्या पार्थिव देहावर सिंदफना नदी तीरावर असलेल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, चार मुले सुना, नातवंडे असा परिवार आहे. एलआयसी चे विकास अधिकारी जयेश जाब्रस, पत्रकार कमलेश जाब्रस, महेश जाब्रस, निलेश जाब्रस यांच्या मातोश्री होत.

### राजमती निर्मळ



**बीड । प्रतिनिधी**

दि.१५.०३.२०२५ रोजी येथील राजमती मोहनराव निर्मळ यांचे अल्पशः आजाराने राहत्या घरी सकाळी ७.४५ वाजता निधन झाले.मृत्यूसमयी त्यांचे वय ७१ वर्ष होते. राजमती निर्मळ या मनमिळावू स्वभावाच्या होत्या त्यांच्या जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे त्यांच्या पश्चात मुलगा राजकुमार, सुन, दोन नाती असा परिवार आहे.

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. आर.आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क. २२२ / २०२५, गिताबाई व ईतर ११ वि. निरंक,**

ज्याअर्थी **मयत नामे गणेश पि.तुळशिराम कार्ले, मौजे रा. मादळमोही, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक ०९/०३/२०१६ रोजी मौजे मादळमोही, ता. गेवराई, जि. बीड** येथे मयत झाले अर्जदार :- १) गिताबाई भ्र. तुळशिराम कार्ले, वय ८० वर्षे, धंदा घरकाम. रा. मादळमोही, ता. गेवराई, जि. बीड , २) शोभा भ्र. गणेश कार्ले, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. मादळमोही, ता. गेवराई, जि.बीड, ३) प्रकाश पि.गणेश कार्ले, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. मादळमोही, ता. गेवराई, जि. बीड, ४) आशाबाई भ्र.सुरेश चव्हाण, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा.टाकरवण, ता. गेवराई, जि.बीड, ५) स्वाती भ्र. संतोष नवले, वय २९ वर्षे, धंदा घरकाम, रा. भडंगवाडी, ता. गेवराई, जि. बीड, ६)रमेश पि.तुळशीराम कार्ले, वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा. मादळमोही, ता. गेवराई, जि.बीड, ७) दिलीप पि.तुळशीराम कार्ले, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. मादळमोही, ता. गेवराई, जि.बीड ८) प्रयागबाई भ्र.किसन कार्ले, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. मादळमोही, ता. गेवराई, जि.बीड, ९) गंगा भ्र .अरूण पवार, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. मादळमोही, ता गेवराई, जि. बीड १०) अनिता भ्र.नागनाथ तकीक, वय ३० वर्षे, धंदा घरकाम, रा. मादळमोही, ता. गेवराई, जि. बीड ११) संगिता भ्र. अरूण गायकवाड, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. जोडवाडा, ता. शिरूर कासार, जि.बीड. १२) रूक्मीण भ्र.शंकर जाधव, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. शहागड, ता.अंबड, जि.जालना

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारण प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मयत नामे गणेश पि.तुळशिराम कार्ले, मौजे रा. मादळमोही, ता. गेवराई, जि. बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनाक १०/०३/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २५/०४/२०२५

**(मार्फत ॲड. बी. एम. मुळे, गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. आर. आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२१७/२०२५, मनिषा व ईतर ४ वि. निरंक**

ज्याअर्थी मयत रूस्तुम पि.श्रीराम काळे, मौजे रा. देवपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक ०१/०७/२०२२ रोजी मौजे रा. देवपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले.

अर्जदार :- १) मनिषा भ्र. संभाजी शेळके, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. उमापुर, ता. गेवराई, जि. बीड. २)शितल भ्र. संभाजी रक्ताटे, वय ३२ वर्षे, धंदा शेती, रा. काळेवाडी, ता. अंबड, जि. जालना. ३) सुरेखा भ्र. विजय मुळे, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. बाचेगांव, ता. अंबड, जि. जालना. ४) संदिप पि. रूस्तुम काळे, वय २८ वर्षे, धंदा शेती, रा. देवपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड. ५) विशाल पि. रूस्तुम काळे, वय २४ वर्षे धंदा शेती. रा. देवपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मयत नामे रूस्तुम पि श्रीराम काळे, मौजे रा. देवपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनाक ०७/०३/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २३/०४/२०२५

**(मार्फत -ॲड. ए. एम. घोडके, गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. एस. पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ४५७/२०२५**

**संतोष तात्या उर्फ तात्याबा उर्फ तात्यासाहेब जाधव वि. निरंक**

अर्जदार-संतोष पितात्या उर्फ तात्याबा उर्फ तात्यासाहेब जाधव, वय - ३७ वर्षे, धंदा - शेती, रा.घाटजवळा पो. ताडसोन्ना ता. जि. बीड

गैरअर्जदार - निरंक

**प्रकरण: भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत तात्या उर्फ तात्याबा उर्फ तात्यासाहेब पि.साहेबराव जाधव यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत **तात्या उर्फ तात्याबा उर्फ तात्यासाहेब पि. साहेबराव जाधव** हे दिनांक १०/०७/२०२० रोजी घाटजवळा ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हा मयताचा एकुलता एक मुलगा आहे. अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. यांच्या शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु **मयत नामे तात्या उर्फ तात्याबा उर्फ तात्यासाहेब पि. साहेबराव जाधव** या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे तात्या उर्फ तात्याबा उर्फ तात्यासाहेब पि. साहेबराव जाधव रा.घाटजवळा ता.जि.बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख ०३/०५/२०२५. आज दिनांक १०/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**(ॲड. वाय. आर. शेळके)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

CMYK

CMYK

दैनिक मराठवाडा पत्र
● epaper.marathwadapatra.com





परमेश्वर सातपुते यांच्या जिल्हाप्रमुख पदाला तूर्तास पक्षश्रेष्ठीकडून स्थगिती देण्यात आली आहे शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या पुढील आदेशापर्यंत प्रभारी जिल्हाप्रमुख म्हणून अन्य व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतु काही विरोधकांनी परमेश्वर सातपुते यांची पक्षातून हकालपट्टी झाली अशी बातमी प्रसार माध्यमांवरती प्रसारीत केली आहे परंतु असे नसून परमेश्वर सातपुते यांना फक्त जिल्हाप्रमुख पदावरून मुक्त केले आहे शिवसेना पक्षातून हकालपट्टी झालेली नाही. यामुळे प्रभारी म्हणून दुसऱ्याकडे जबाबदारी दिली जरी असली तरीही लवकरच या संदर्भात पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांची भेट घेऊन या संदर्भात सविस्तर चर्चा करणार असल्याचे परमेश्वर सातपुते यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे..!!



*बीड: शिवसेनेचे नवनिर्वाचित जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम यांना शुभेच्छा देताना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे.*

## माजलगाव पोलीस प्रशासनाची कार्यवाही म्हणजे निव्वळ देखावा

# चोर सोडून संन्याशाला फाशी

### माजलगाव करांची मटका बुक्की बंद करण्याची मागणी ; मात्र पोलीस करू लागले खेळणारा कारवाई

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव शहरासह ग्रामीण भागात मटका नावाचा जुगार राजरोसपणे चालू आहे हा मटका नावाचा जुगार बंद व्हावा यासाठी माजलगावच्या पत्रकारांनी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांना निवेदन दिले आणि बातम्या प्रकाशित झाल्या ही बाब लक्षात घेता माजलगाव पोलिसांनी थातूरमातूर कारवाई करत मटका खेळणारा वर कारवाई केली मात्र हप्ते देणाऱ्या मटका बुकी चालक, मालक यांच्यावर कारवाई केलीच नाही यामुळे माजलगाव मतदार संघातील जनतेच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे पोलिसांना हप्ते मिळत असल्यामुळे पोलीस मुळासकट मटका बंद करूच शकत नाही अशी चर्चा व्यापारी वर्गात सर्वसामान्य बोलली जाऊ लागली आहे पोलिसांनी यावरून तरी बोध घ्यावा सर्वसामान्य जनता सुज्ञ नागरिक आपल्याकडे कोणत्या नजरेने पाहत आहेत हे तरी ओळखायला हवे भाड मे गयी जनता आपणा काम बनता हे कुठेतरी थांबायला हवं आज झालेल्या कारवाया म्हणजे किर्तन बंद केले, तम शा मात्र चालूच राहणार याचा दर्शन देणारा प्रकार आहे माजलगाव मटका अड्ड्यावर अनेक राजकीय पुढार्यांची हस्तक स्वार आहेत त्यामुळे त्यांच्यावर कारवाई होणारच नाही का गोरगरीब जनतेला तुम्ही अटकाव कराल मोठ्या धेंनडावर कार्यवाही करणार आहात की नाही म्हणजे बीड जिल्ह्यासह माजलगाव पोलीस राज करण्याची पाठीराखी आहे असे दिसून येत आहे मात्र कावत साहेबा कडून अपेक्षा ठेवून असलेली जनता आणखीनही मुळासकट मटका बंद होईल या आशेवर थांबलेले आहे पोलीस जर कायद्याचे पालन करणार नसतील तर वेळप्रसंगी कुठेतरी जनता कायदा हातात घेऊ शकते याचे भान बीड जिल्ह्यास माजलगाव पोलिसांनी ठेवायला हवे आणि आपल्या कारवाया करायला हव्यात असे मत जनतेतून व्यक्त केले जात आहे

# किती विनाअनुदानित शिक्षकांचा बळी घेतल्यावर सरकार वाढीव टप्प्यासाठी आर्थिक तरतूद करणार

### विनाअनुदानित शिक्षकांचा संतप्त सवाल ; वाढीव टप्पा अनुदानासाठी भरीव आर्थिक तरतूद करा ; अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील एका विनाअनुदानित शाळेत काम करणाऱ्या नागरगोजे नावाच्या शिक्षकांनी वेतनासाठी आत्म हत्येचे टोकाचे पाऊल उचलले ही महाराष्ट्रासाठी अत्यंत खेदाची आणि चिंताजनक बाब आहे. या सरकारला अजून किती विना अनुदानित शिक्षकांचा बळी घेतल्यानंतर विना अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना वाढीव टप्प्यासाठी लागणारी आर्थिक तरतूद करणार? शिवाय शंभर टक्के अनुदान कधी देणार? असा संतप्त सवाल महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे छत्रपती संभाजीनगर विभागाचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, उपाध्यक्ष भागवत यादव यांनी केला आहे.



बीड जिल्हासह महाराष्ट्रामध्ये हजारो विनाअनुदान तत्त्वावर सुरू असलेल्या शाळेमध्ये लाखोंच्या संख्येने शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी काम करत आहे. या सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पगारासाठी आपल्या हक्काच्या वेतनासाठी वारंवार आंदोलन केली. तेव्हा सरकारने अनुदान जाहीर केले. परंतु अनुदान जाहीर केल्यापासून अजतागायत

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड : डॉ.भीमराव पिंगळे विद्यालयात आज आर.सी.एफ.एस.सी.व एस.टी.च्या गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय उपक्रम घेण्यात आला.आचार्य विनोबा भावे शिक्षण संस्थेचे सचिव युवराज भैय्या जगताप, बळीराम नाडे मानव विकास मिशन प्रमुख, बालासाहेब इंगोले, सरपंच धानोरा, वरवटी.प्रदिप कोटुळे, उपसरपंच धानोरा, वरवटी. नितीन दिवे पोलीस पाटील धानोरा,कोटुळे टेलर यांच्या हस्ते विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनींना चेकचे वाटप करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक श्री रोहिदास डोंगरदिवे सर यांनी प्रास्ताविक केले.बळीराम नाडे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.युवराज भैय्या जगताप यांनी अध्यक्षीय समारोप केला.*



*बीड: मंजरथ-माजलगाव तालुक्यातील श्री क्षेत्र मंजरथ याठिकाणी आज दि.१५ जंगी कुस्ती कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा पार पडला यानिमित्त मैदानावर मल्ल कुस्तीचा आखाडा गाजवताना टिपलेले हे छायाचित्र.*

# मानसाने पाप कर्म न करता सदाचाराचे जिवन जगले पाहिजे : पुज्य भदन्त शरणानंद महाथेरो

### सांची बुद्ध विहारात फाल्गुण पौर्णीमा साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगावच्या वतिन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी वसाहत येथे सातत्यान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ गतीमान करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात याचा एक भाग म्हणुन दि.१४ मार्च २०२५ वार शुक्रवार रोजी फाल्गुण पौर्णीमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमास प्रमुख धम्मदेशना देण्यासाठी पुज्य भदन्त शरनानंद महाथेरो हे उपस्तीत होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते पुज्य भदन्त शरनानंद महाथेरो आपल्या धम्मदेशनेत मनुष्याने पापकर्म न करता सदाचाराचे जिवन जगले पाहीजे आसे प्रतिपादन केले ते पुढे बोलताना म्हणाले कि बुद्धा चा धम्म हा शुद्ध जिवन जगण्याचा मार्ग आहे तो परिपुर्ण अंगीकारला



▶▶ उर्वरित पान २ वर

## हा मयत आपल्या ओळखीचा आहे का?



बीड- सदर इसम अनोळखी इसम वय ६५ ते ७० वर्ष यांनी पंढरपूर शहर पोलीस ठाणे हद्दीत गळफास लावून घेवून आत्महत्या केली आहे सदर इसम याच्याकडे गेवराई येथील बस तिकीट मिळाले आहे. सदर इसम हा वारकरी असल्याचे दिसून येत आहे. सदर इसमाचा नातेवाईकबाबत काही माहिती मिळाल्यास, तसेच कुठे मिसिंग नोंद असल्यास पंढरपूर शहर पोलिस ठाणे येथील, पो हवालदार शेजाळ मो ८४५९३४७७१६, सहा पोलीस निरीक्षक वाघे मो ९१४६७६२९२९ वरती संपर्क साधावा.




## मयत कोणाच्या ओळखीचा आहे का?



बीड- सर्व नागरिकांना आवाहन आहे की, बीड बस स्टॅन्ड समोर एक अनोळखी पुरूषाची डेड बॉडी मिळून आली असून त्याचे वर्णन खालील प्रमाणे पुरूष वय अंदाजे ४५ ते ५० अंगाने सडपातळ, रंग सावळा अंगावर लाईनचा पांढरा शर्ट व निळसर पँट सदर इसम कोणाचे ओळखीचा असल्यास शिवाजीनगर पोलीस स्टेशन बीड यांचेशी संपर्क साधावा. पोलीस निरीक्षक मारूती , मोबा ९८२३६७१६७९, सहा पो निरीक्षक संदीप, मोबा ८८०५० ११८३१



*बीड: शिवपार्क कॉलनीमधील नागरिकांनी उत्साहात व शांततेत होळी, धुलीवंदन साजरी केली.*

# यंदा विड्यातील "जावयाची गर्दभ सवारी" परंपरा खंडित

## संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेने गावावर दु:खाचे सावट

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील विडा येथे धुळवडीच्या दिवशी गावच्या मुलीशी विवाह केलेल्या जावयाची गाढवावरून मिरवणूक काढून व नंतर सन्मानाने आहेर आदी करण्याची एक अनोखी परंपरा आहे. मागील काही दशकांपासून सुरू असलेली ही परंपरा करोनाचे वर्ष वगळता यंदा प्रथमच खंडित झाली असून, त्याला अलिकडे घडलेल्या संतोष देशमुख हत्या प्रकरणासारखी दुः खाची किनार आहे.

विडा आणि संतोष देशमुख यांचे म स्साजोग ही दोन्ही गावे केज तालुक्यातच असून, दोन्हीमध्ये अवघे पाच ते सहा



किलोमीटर अंतर आहे. त्यामुळे संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेतील दुः खाचे सावट विडा गावावरही आहे. त्यातूनच ग्रामस्थांनी यंदा गावची परंपरा असलेल्या जावयाची गर्दभ स्वारीला खंड देण्याचा निर्णय घेतला आहे.

काय आहे परंपरा

निजामकालीन जहागीरदार ठाकूर आनंदराव देशमुख यांनी धूलिवंदनाच्या दिवशी सासुरवाडी असलेल्या विडा येथे आलेले त्यांचे जावई बाळानाथ चिंचोली (जि. लातूर) यांची थट्टामस्करीतून गाढवावर बसून सवारी काढली होती. तेव्हापासून धूलिवंदनाच्या दिवशी जावई बापूंची गाढवावरून मिरवणूक काढण्याची परंपरा रूढ झाली. विडा येथील जावई शोध समिती ही जावईबापूला पकडून आणते. धुलिवंदनाच्या दिवशी ग्रामपंचायतीसमोर चपलाचा हार घातलेल्या गाढवावर बसवून मिरवणुकीला सुरुवात केली जाते. वाजत-गाजतमिरवणूक काढली जाते.

जावई बापूंना अंगठीचा आहेर

गावातील प्रमुख रस्त्यांवरून वाजत-गाजत गर्दभ सवारी हनुमान मंदिरासमोर येते. लोकवर्गणीतून जमलेल्या पैशांतून खरेदी केलेला कपड्यांचा आहेर जावईबापूला दिला जातो. सासऱ्याच्या ऐपतीप्रमाणे सोन्याची अंगठी भेट दिली जाते. गावाची परंपरा मानून मिरवणुकीत कधीही भांडण-तंटा, मान-अपमान असा प्रकार घडलेला नाही. सर्व जाती-धर्माच्या जावयांना या गावकऱ्यांनी मिरवले आहे.

